- पोलीस शिपाई चालक भरती २०१९ -

जाहिरात क्रमांक :- ४१४६ दिनांक ३०/११/२०१९

पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक यांची (१९) रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक ०२.१२.२०१९ ते दिनांक २२.१२.२०१९ या कालावधीत भरण्यात येणार आहेत. ह्या बद्दलची सविस्तर माहिती www.mahapariksha.gov.in, www.amravaticitypolice.gov.in आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील तरतुदी पोलीस शिपाई चालक पदासाठी लागू आहेत.

- पोलीस शिपाई चालक पदासाठी उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावा लागेल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा www.mahapariksha.gov.in या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे. पोलीस शिपाई चालक पदासाठी एकाच पोलीस घटकात एकापेक्षा जास्त अर्ज करण्यास मुभा नाही. जर एका उमेदवाराने एकाच पोलीस घटकातील पोलीस शिपाई चालक पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत, असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.

- पोलीस शिपाई चालक पदाच्या आवेदन अर्जांसाठी उमेदवाराची लेखी परीक्षा महापरीक्षा पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने आधी घेण्यात येणार आहे. शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे मोजमाप व शारिरीक चाचणी उमेदवाराने ज्या पोलीस घटकासाठी अर्ज केला आहे, त्या पोलीस घटकांमार्फत घेण्यात येईल. दोन घटकांतील शारीरिक चाचणीच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी ह्या कार्यालयाची राहणार नाही व त्यामध्ये बदल करता येणार नाही.

- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.

- **सेवाप्रवेश नियमांमधील तरतुदींनुसार भरती प्रक्रियेमध्ये प्रथम लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर गुणत्तेनुसार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सदरहू वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी ही अर्हता चाचणी असेल. त्यानंतर उमेदवारांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल.** ऑनलाईन घेण्यात आलेली लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीत उमेदवारांना प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची एकूण संख्या / पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना www.mahapariksha.gov.in व www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहू जाहिरात काळजीपूर्वक वाचून, समजून घेऊन व रिक्त पदांबाबतची खातरजमा करुन उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.

**प्रशांत होळकर (भा.पो.से.)**
प्र.पोलीस आयुक्त, अमरावती शहर

Scanned by CamScanner